www.vinoba.in



# ग्राम-सेवा-वृत्त

## मासिक–पत्र

★

### अनुक्रमणिका



| लेख | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|
| १. रामकृष्ण आणि चरखा | विनोबा | १ |
| २. झांकलें माणिक | शं. वि. ठकार | २ |
| ३. अंबरावताराची उपासना | शिवाजी | ३ |
| ४. जागृतीचीं साधनें | विनोबा | ५ |
| ५. खेडवळांचे शहाणपण | द. दास्ताने | ७ |
| ६. प्रेमाचा धागा काढा ! | म. दिवाण | ९ |
| ७. यंत्राचा उपयोग आणि मानवहित | कि. घ. म. | ११ |
| ८. पहांटचें उठणें | वल्लभभाई | १९ |
| ९. खादी व्यापक कशी होईल ? | बुद्धसेन | २० |
| १०. वाचकांना | विनोबा | २३ |



★


वर्गणी :

वार्षिक वर्गणी १ रुपया

संपादक :

वल्लभभाई भगवानजी पटेल

www.vinoba.in

# 'वृत्त' वर्गणीदारांची जिल्हेवारी यादी.

| मध्यप्रांत व वऱ्हाड | गांव | संख्या |
|---|---|---|
| वर्धा जिल्हा | ४४ | १५६ |
| नागपूर जिल्हा | ९ | २३ |
| चांदा जिल्हा | १९ | ४६ |
| भंडारा जिल्हा | ८ | २५ |
| यवतमाळ जिल्हा | १२ | ३१ |
| अमरावती जिल्हा | १२ | २८ |
| अकोला जिल्हा | ६ | १६ |
| बुलढाणा जिल्हा | ९ | १० |
| **खानदेश** | | |
| पूर्व खानदेश | ८० | ३७२ |
| पश्चिम खानदेश | १८ | ६५ |
| **मुंबई इलाखा** | | |
| नाशिक जिल्हा | ५ | २० |
| पुणें जिल्हा | ९ | ११५ |
| नगर जिल्हा | २ | २ |
| ठाणें जिल्हा | ३ | ३ |
| मुंबई जिल्हा | ५ | ७५ |
| रत्नागिरी जिल्हा | १० | ११ |
| सातारा जिल्हा | ८ | १४ |
| सोलापूर जिल्हा | ३२ | ३४ |
| **इतर** | | |
| कुलाबा जिल्हा | १ | १ |
| भादरान | १ | १ |
| लोणावळा | १ | १ |
| अंबरनाथ | १ | १ |
| मालेगांव बाजार | १ | १ |
| **महाकोशल** | | |
| बैतुल जिल्हा | ३ | ३ |
| छिंदवाडा जिल्हा | २ | २ |
| जबलपुर | १ | १ |
| नेमाड जिल्हा | २ | ७ |
| बालाघाट जिल्हा | १ | १ |

| | गांव | संख्या |
|---|---|---|
| हुशंगाबाद जिल्हा | १ | १ |
| द्रुग जिल्हा | १ | १ |
| **यू. पी.** | | |
| साहरानपुर जिल्हा | २ | २ |
| अलाहाबाद | १ | १ |
| गोरखपुर | १ | १ |
| फरुखाबाद | १ | १ |
| **गुजरात** | | |
| सुरत | ४ | ४ |
| कैरा | १ | १ |
| अहमदाबाद | १ | १ |
| खेडा | १ | १ |
| काठियावाड | १ | १ |
| **कर्नाटक** | | |
| बेळगांव | ४ | ११ |
| धारवाड | १ | १ |
| सिरसि | १ | १ |
| **स्टेट** | | |
| निजाम | ७ | ८ |
| कोल्हापुर | १ | ४ |
| धार | १ | १ |
| ग्वालियर | १ | १ |
| सांगली | १ | १६ |
| बडोदा | १ | ३ |
| मिरज | १ | २ |
| इंदोर | २ | २ |
| जयपुर | १ | १ |
| भावनगर | १ | १ |
| होलकर | १ | १ |
| मालवा | १ | १ |
| इचलकरंजी | १ | १ |
| गोवा | १ | १ |

—व्यवस्थापक

www.vinoba.in

# ग्राम-सेवा-वृत्त

वर्ष ५ } १५ एप्रिल १९४१ { अंक १

## रामकृष्ण आणि चरखा

[ विनोबा ]

रामकृष्ण परमहंसांनी ईश्वर-दर्शनासाठीं अनेक प्रकारांनी साधना केली होती. त्यांत एक प्रकार 'मधुरा'भक्तीचा होता. मधुराभक्तींत स्वतःला स्त्री समजून पतिभावानें ईश्वराची भक्ति करावयाची असते. अशा तऱ्हेचें भक्ति-भाग्य गोपींना लाभलें होतें. त्या आधारानें रामकृष्ण स्वतःला गोपींच्या ठिकाणीं कल्पून श्रीकृष्णाच्या उपासनेचा अभ्यास करीत होते. त्यावेळची त्यांची भावना त्यांच्या चरित्र-ग्रंथांत खालील प्रमाणें दिली आहे—

त्यांना वाटे, 'पुन्हां जर जन्म घेण्याची च पाळी आली तर एखाद्या ब्राह्मणाच्या घरीं सुस्वरूप दीर्घकेशी बालविधवेचा जन्म घेईन आणि श्रीकृष्णावाचून कोणाला हि पति म्हणून समजणार नाहीं. निर्वाहापुरतें अन्न-आच्छादन असावें. एखादें लहानसें कुडाचें घर असावें. त्याच्या भोंवतीं थोडीशी जमीन असावी. त्या जमिनींत पांच-चार प्रकारच्या भाज्या उत्पन्न करता याव्या. घरीं एक दुभती गाय असावी. तिची सर्व सेवा-शुश्रूषा स्वतःला करतां येऊन तिची धार हि काढतां यावी. आणि एक सूत काढण्याचा चरखा असावा. म्हणजे दिवसां उजेडीं घरकाम आटपून त्या चरख्यावर सूत काढतां काढतां श्रीकृष्णाचीं गाणीं म्हणेन, आणि तिन्हीसांजा झाल्या म्हणजे त्या गाईच्या दुधांत तयार केलेली खीर वगैरे हातांत घेऊन, श्रीकृष्णाला आपल्या हातांनीं खाऊं घालण्यासाठीं एकांतात बसून अत्यंत व्याकुळतेनें रडत रडत त्याचा धावा करीन. श्रीकृष्णाला सुद्धां माझी दया येईल. आणि बालक-वेषानें येऊन तो माझ्या हातांतील ते सारे पदार्थ ग्रहण करील. आणि असे च रोज रोज दुसऱ्याला कळवूं न देतां गुपचुप येऊन तो माझ्या हातून खाण्याचे पदार्थ घेत जाईल.' [महाराष्ट्र-धर्म

www.vinoba.in 

# श्री. जमरूतखां वजीरखां पठाण

[ ले. शंकर विनायक ठकार ]

महात्मा गांधींनी या देशावर जे अनंत उपकार करून ठेवले आहेत त्यांपैकीं सहसा एकदम लक्षांत न येणारा, परंतु राष्ट्राच्या अभ्युदयाच्या दृष्टीनें अत्यंत बहुमोल असा उपकार म्हणजे या देशांत इतस्तत: विखुरलेलीं जीं झांकलीं माणकें आहेत त्यांना प्रकट होण्याची त्यांनीं दिलेली संधि, हा होय.

अशाच एका झांकल्या माणकाचा मला कांहीं दिवसांपूर्वीं परिचय होण्याचें भाग्य लाभलें.

पूर्व खानदेश जिल्ह्यांत पाचोऱ्याजवळ अतुर्ली नांवाचें एक खेडें आहे. तेथील रहिवासी श्री. जमरूतखां वजीरखां पठाण हे च ते गृहस्थ होत. त्यांचा चारितार्थाचा धंदा म्हणजे 'व्हिलेज (खेडेगांवचा) पोस्टमन' हा होता. १९३३ सालअखेर त्यांनीं पेन्शन घेतलें. त्यांना सध्यां १४॥ रु. पेन्शन मिळत आहे.

व्हिलेज पोस्टमन या नात्यानें ते काम करीत असतां त्यांचा सुमारें २०।२५ खेड्यांशीं नित्य संबंध येत असे. आपल्या कायदेशीर सरकारी वेतनाखेरीज त्यांनीं एक पै हि कधीं खाल्ली नाहीं—फार काय, ते या कामावर असतांना कोणाच्या घरीं कधीं पाणी हि प्याले नाहींत. मग चहा, चिरिमिरीची गोष्ट च कशाला ! या त्यांच्या निर्मळ आचरणामुळें त्यांच्याबद्दल सर्वत्र फार आदर वाटत असे. शिवाय ते स्वत: सर्वथैव निर्व्यसनी असल्या-मुळें त्यांच्यासमोर लोक बिडी ओढण्यास हि कचरत असत.

ते २० वर्षांपासून संपूर्ण खादीधारी आहेत व पेन्शन घेतल्यापासून तर ते विनावेतन खादी प्रसाराचें काम करीत असतात. १९३५ साला-पासून त्यांनीं गांधी-वाङ्मयाच्या प्रचारार्थ २०० रु. बिनव्याजी भांडवल दिलेलें आहे. अद्याप हि खादी-प्रसारार्थ खेड्यापाड्यांतून फिरत असतांना आपलें जेवणखाण स्वखर्चानें च करीत असतात. ते स्वत: १९१९ साला पासून विधुरावस्थेंत असून त्यांची बहीण व भाची या दोघी हि विधवांचें संगोपन करीत असतात. या दोघी हि भगिनी संपूर्ण वस्त्र-स्वावलंबी असून त्यांच्या चुलत बहिणीचा एक मुलगा गेल्या ४ वर्षांपासून मगनवाडीला ग्रामोद्योग दुकानावर काम करीत असतो. महात्मा गांधींच्या आशीर्वादानें व उदाहरणानें आपल्या जन्माचें सार्थक झालें असें या सर्वांस वाटत आहे.

www.vinoba.in

# अंबरावताराची उपासना

[ ले. शिवाजी भावे ]

तीन मल त्रिज्येच्या भूपृष्ठावरचें आकाश म्हणजे परमेश्वरी सृष्टीच्या नव्या दालनाचा दरवाजा. हा कांहीं लहान-सहान दरवाजा नव्हे ! पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनासाठीं सारा महाराष्ट्र लोटत असतो. शतकेंच्या-शतकें हा क्रम चालू आहे; पण दर्शनाची मात्र मुळींच सोय नाहीं. कारण 'समचरण विटेवर' उभ्या राहिलेल्या समत्वमूर्ति विठोबापर्यंत हरिजनांना जाऊं च देत नाहींत. ज्यांना जाऊं देतात, त्यांना सुद्धां बडव्यांचा त्रास असतो च. शिवाय दरवाजा अगदीं लहान. तसें येथें मुळीं च नाहीं. हा दरवाजा विशाल आहे. येथें कोणाला हि मज्जाव नाहीं. कोणाचा हि त्रास नाहीं. ज्यांना डोळे आहेत त्या सर्वांनीं यांतून खुशाल केव्हां हि दर्शन घ्यावें.

पण पावसाळ्यांत चार महिने ढगांमुळें या दर्शनांत आडकाठी येणार नाहीं का ? असें कोणी म्हणेल. परंतु ही सुद्धां आडकाठी म्हणतां येणार नाहीं. पावसाळ्यांतलें आकाशदर्शन हि खरोखर अत्यंत बोधप्रद असतें. महादेवाला अभिषेक करतात तसा सहस्रधारांचा अभिषेक आकाश या जनतारूप महादेवाच्या डोक्यावर यावेळीं करीत असतें. हा देखावा पाहण्यासाठीं ऋषि वेदाभ्यास सुद्धां बंद ठेवीत असत. यावेळीं समुद्रांत राहणारी लक्ष्मी च पावसाच्या रूपाने हिरवे गार गालिचे पृथ्वीवर उठवून देण्यासाठीं येत असते. उन्हाळ्यांत पानें, फुलें, फळें भरपूर आलेलीं असतात. शेवटीं आकाशांतून पावसाचें पाणी येऊन—

पानें फुलें फळें पाणी जो प्रेमें मज देतसे।
तें मी पवित्र भक्ताचें अर्पिलें खातसे सुखें ॥१॥

'या भगवंताच्या वाक्याची पूर्णता झालेली प्रत्यक्ष पहावयास सांपडते. याशिवाय आणखी पावसाच्या दर्शनाचा बोध निराळा च आहे. ढगांतून जशा पाण्याच्या धारा पडतात तशा सुताच्या सहस्र धारा प्रत्येक घरीं निघाव्या. हा पदार्थ-पाठ स्वावलंबी खेड्याला या वेळचें आकाश-दर्शन

www.vinoba.in

देत असतें ! आणि खरोखर च कांतण्याला पावसाळा हा फार अनुकूल ऋतु आहे. सुताच्या गिरणींत मुद्दाम पावसाळ्यासारखी भिजट हवा उत्पन्न करतात. भिजट हवेंतल्या ओलाव्यामुळें सूत तुटत नाहीं. बरें, यावेळीं कामें हि फार नसतात. आहार हि कमी घ्यावयाचा असतो. खेड्याला लागणारें बहुतेक सर्व सूत या वेळीं कांतता येईल. हिन्दुस्थानांत सरासरी माणशीं दर वर्षाला १६ वार कपडा लागतो असें धरलें तर ५ माणसांच्या कुटुंबाला ८० वार कापड लागेल. म्हणजे १०० घरांच्या खड्याला ८ हजार वार कापड लागेल. दर चौरस वाराला ४ फुटाच्या ६४० तारांच्या ४ गुंड्या सूत धरलें तर ८ हजार वार कपड्याला ३२ हजार गुंड्या लागतील. रोज दर कुटुंबांत दोन गुंड्या कांतल्या तर शंभर कुटुंबांत रोज २०० गुंड्या, म्हणजे १६० दिवसांत—पांच महिने दहा दिवसांत—हें सर्व सूत कांतलें जाईल. दररोज थोडें ज्यास्त कांतलें तर पावसाळ्यांत हें सर्व सूत कांतून होणें अशक्य नाहीं. तथापि आठ महिने थोडें कांतावें आणि पावसाळ्यांत विशेष कांतावें. असें करणें सहज शक्य आहे.

दुःशासनामुळें द्रौपदीचें वस्त्रहरण केलें जात होतें ही गोष्ट सर्वांना माहीत आहे. हिंदुस्थानची स्थिति हि अशीच झालेली आहे. एका दृष्टीनें दुःशासनामुळें (म्हणजे वाईट राज्यपध्दतीमुळें) हिंदुस्थानचें वस्त्रहरण होत आहे. भगवंतांना द्रौपदीसाठीं—

शेले, शालू, साड्या, क्षीरोदक, लांबरुंद पाटावे ।
झाला अनंत वस्त्रें; कीं तीस अनाथसें न वाटावें ॥

अस वस्त्ररूप धारण करून तिचें रक्षण केलें.

हा अंबरावतार श्रितलज्जारक्षणार्थ अकरावा ।
प्रभुमत असे सदवनीं आग्रह वेषीं कदापि न करावा ॥

असें कविनें त्याचें मार्मिक वर्णन करून हा अकरावा अंबरावतार (वस्त्रावतार) च झाला, असें म्हटलें आहे. हिंदुस्थानांतल्या प्रत्येक खेड्यांत जर कशाची

अत्यंत जरूरी असेल तर ह्या अंबरावताराची च जरूरी आहे. आकाशाला हि अंबर म्हणतात. पावसाळ्यांतलें आकाश तर प्रत्यक्ष अंबरावताराचें च दृश्य असते. यावेळीं जणूं काय सर्व आकाश च पावसाच्या रूपानें पृथ्वीवर उतरतें. आणि जिकडे-तिकडे पृथ्वीला हिरव्या वस्त्रानें झांकून टाकून, तिचें संरक्षण करते. अंबरावतार धारण करणाऱ्या भगवान् श्रीकृष्णाचा जन्म हि पावसाळ्यांत श्रावण-झड लागली असतां मध्यरात्रीं श्रावण वद्य अष्टमीला झाला.

म्हणून चार महिन्यांचा पावसाळा, ही आकाश-दर्शनामध्यें आडकाठी नाहीं. आठ महिने आकाशांत सतत उडत असणारे धुळीचे कण पावसामुळें नष्ट होऊन पुढील दर्शनाच्या दिवाळीची त्यामुळें पूर्वतयारी होते; आणि नाना तऱ्हेचा बोध मिळून अंबरावताराच्या उपासनेला अनुकूलता लाभते.

---

## जागृतीचीं साधनें

[ विनोबा ]

एखाद्या निजलेल्या माणसाला जागें करावयाचें आहे, तर आपण हातांनीं त्याचें शरीर हालवितों आणि त्याला 'अमक्या ऊठ' म्हणून हांक मारतों. ह्या दोन क्रिया एकत्र केल्या म्हणजे तो मनुष्य लवकर उठतो. ऋषि जव्हां शमदमादि कर्तव्यें आणि स्वाध्याय-प्रवचन ह्यांचा जोडीनें उपदेश करतात तेंव्हां त्या जोड गोळीनें आत्मा लवकर जागृत व्हावा, अशी त्यांची योजना आहे. शमदमादि कर्तव्यें म्हणजे शरीर गदगदां हालविणें आणि स्वाध्याय-प्रवचन म्हणजे हांक मारणें. तोंडानें हांक मारून शरीर गदगदां हालविलें म्हणजे माणूस तावडतोब खडबडून जागा होतो.

राष्ट्राला जागें करण्यासाठीं राष्ट्रीय चळवळी असतात. त्यांत हि ह्याच दोन गोष्टींची अवश्यकता असते. लहान-थोर, गरीब-अमीर, जाणते-नेणते, सर्वांच्या हातून स्वराज्याचें प्रत्यक्ष काम आणि तें हि राष्ट्रीय निष्ठा उत्पन्न

होण्यासाठीं नित्य कर्माच्या स्वरूपाचें म्हणजे एकरूप—असें कांहीं तरी होत राहिलें पाहिजे. चरख्यावर सूत कांतण्याचें काम हें नित्यकर्म होण्यालायक आहे. इतर हि राष्ट्र सेवेचीं कामें आहेत. तीं यथाशक्ति करावीं च. पण सूत कांतण्याचा नित्यधर्म मात्र दरेकानें आचरावा. समर्थांच्या वचनांत थोडा फरक करून,

**"बहु चांगलें काम हें कांतण्याचें। अती साजिरें स्वल्प सोपें फुकाचें ॥"**

असें सहज म्हणतां येईल. कांतण्याचें काम राष्ट्राला स्वावलंबन शिकविणारें म्हणून 'चांगलें'; राष्ट्राची नग्नता झांकणारें म्हणून 'साजिरें', विशेषशा साधनाशिवाय एका लहानशा चातीवर हि होऊं शकणारें म्हणून 'स्वल्प', स्त्री-पुरुष, बाळ-वृद्ध, अशक्त-अडाणी सर्वांना करतां येण्यासारखें म्हणून 'सोपें', आणि नुसतें 'फुकाचें' च नव्हे पण आणखी दोन दाम देणारें असें आहे; म्हणून तें स्वराज्याच्या राष्ट्रीय चळवळीचें नित्यकर्म होण्याला सर्व प्रकारें योग्य आहे. ह्या नित्यकर्माचें चक्र राष्ट्रभर चालू करतां आल्यास त्यानें राष्ट्राचें शरीर गदगदां हालेल. राष्ट्राच्या हृदयाला स्वराज्याच्या चळवळीचे शारीरिक धक्के बसतील. आणि त्याबरोबर च इकडे हांक मारण्याचें हि काम सारखें चालू असलें तर राष्ट्रपुरुष तेव्हां च जागा होईल.

पण हें हांक मारण्याचें काम हि सतत चालू राखलें पाहिज. देवाच्या मूर्तिसमोर श्रवण-कीर्तन अवश्य पाहिजे. त्याशिवाय भक्तिमार्गाची पूर्ति होऊं शकत नाहीं. ऋषीला हि शमदमादि साधनाबरोबर स्वाध्याय-प्रवचन हवें च. राष्ट्राची झोंप म्हणजे कुंभकर्णाची झोंप. तेथें शरीराला टोंचण्या हव्यात. चळवळीच्या तत्त्वांचें कीर्तन खेड्यां-पाड्यांतून, देशाच्या कोना-कोंपऱ्यांतून होत राहिलें पाहिजे. चरखा हें चळवळीचें 'यंत्र' आहे. पण यंत्राला मंत्राची जोड पाहिजे. चळवळीच्या मंत्राचें उच्चारण चालू राहिल्यानें श्रद्धा दृढ होईल; आणि श्रद्धा दृढ झाली म्हणजे संकल्पाची सिद्धि होईल. किंवा चरखा चालविणें हें तप म्हटलें तर तत्त्व-संकीर्तन हा जप म्हणावा. तपाची टोंचणी लावूं आणि जपाचे नगारे पिटित राहूं तेव्हां राष्ट्रपुरुष जागा होईल.

महाराष्ट्र-धर्म ]

www.vinoba.in

# खेडवळांचे शहाणपण

लेः ३ रा

[ दत्तात्रय दास्ताने ]

नालवाडीच्या विणकाम कार्यालयांत तालुक्यांतील त्याचप्रमाणें सावलीकडील हि कांहीं विणकर आपल्या कामासाठीं आहेत. सर्व विणकर परगांवचे असल्यामुळें त्यांच्या राहण्याची व्यवस्था हि आश्रमच्या जवळ च परंतु नालवाडीतलीं घरें भाड्यानें घेऊन केली आहे. नालवाडीचें खादीचें काम सुरू होऊन आतां २॥–३ वर्षें होत आलीं. ह्या अवधींत विणकरांचा आश्रमशीं बराच निकटचा संबंध आला. आश्रमचा संबंध एक प्रकारें अनाक्रमणशील च असतो. म्हणजे आश्रमच्या वातावरणाजवळ राहून हि अलिप्त राहूं इच्छिणारांना कसली च उपाधि नसते. परंतु त्याचबरोबर परिणामक्षम व्यक्तींच्या जीवनावर योग्य तो परिणाम घडून येण्यास हि भरपूर सामुग्री असते. नालवाडीला येऊन राहिलेल्या विणकरांच्या जीवनावर हि असा परिणाम कमी-अधिक प्रमाणावर होत असल्याचें दिसून येत आहे. उदाहरण म्हणून नुकता च घडलेला एक प्रसंग नमूदण्यासारखा आहे.

नालवाडीला असलेल्या सावलीच्या विणकरांपैकीं एका विणकर मुलाचा —टीकादासचा—विवाह-समारंभ झाला. विणकर हरिजन आहे. विवाह मूलजवळील विहीरगांवीं झाला. हें गांव चरखा-संघाच्या मूल-कार्यालयापासून दोन-एक फर्लांगावर आहे. कामानिमित्त बुद्धसेन आणि मी त्याच सुमाराला मूलला होतों. प्रत्यक्ष विवाहाला मला हजर राहतां आलें नाहीं. परंतु बुद्धसेन जाऊन आले. विवाहानंतर सावलीला टीकादासनें आपल्या घरीं आग्रहानें जेवायला बोलाविलें. मुलगा प्रेमळ आणि उत्साही आहे. जेवतांना विवाहाबाबतची माहिती विचारतां आली. मुलगा २२ वर्षांचा, मुलगी १६-१७ वर्षांची. विवाह संपूर्ण खादीच्या पोषाखांत झाला. विधि आधुनिक पद्धतीचा. सर्व विधि पाऊण एक तासांत आटोपला. पुरोहित हरिजन च होता. त्यानें हि विनामूल्य काम केलें. वरात नाहीं, वाजंत्री नाहीं, पक्वान्न नाहीं; दागिने

www.vinoba.in



चांदीचे च करतात पण ते हि मोजके च केले होते. विशेष म्हणजे मुला-मुलीकडल्या बायामंडळींना विधीबाबत आणि पद्धतिबाबत पूरा संतोष होता. मुलीचा बाप दागिने जास्त करायला पाहिजेत या मुद्यावर रुसला होता. परंतु मुलीच्या आईनें आणि इतर मंडळींनीं त्याची समजूत घातली.

कुटुंबांत एकूण सात मंडळी. वर्धा ते सावली जाण्यायेण्याचा प्रवास खर्च (प्रत्येकीं चार रुपये), खादीचे मुलामुलीचे कपडे, दागिने आणि जेवण इत्यादि मिळून ७५-८० रुपयाच्या आंत सर्व खर्च आटोपला.

वरील प्रसंगांत तसें पाहिल्यास विशेष असें कांहीं वाटण्यासारखें नाहीं. परंतु मानसशास्त्रदृष्ट्या याकडे पाहिल्यास हें एक मोठें च परिवर्तन असल्याचें दिसून येईल. विवाह-प्रसंगा सारख्या बाबतींत अनेक लोकांच्या अनेक भावना, रूढी, समजुती, मानापमान वगैरे पन्नास प्रश्न उपस्थित होतात. त्यांतल्या-त्यांत हरिजनांसारख्या जातींत नवीन विचार ग्रहण केला जाणें त्याहून कठिण असें च मानलें जातें. परंतु वातावरणाचा, संगतीचा आणि कार्याचा जीवनावर कसा परिणाम होऊं शकतो आणि हा परिणाम वरच्या समजल्या गेलेल्या वर्गापेक्षां या वर्गावर किती सहजतेनें आणि लवकर होऊं शकतो हें या प्रसंगानें दिसून येणारें आहे. 'खेडवळ' हृदयाच्या ऋजुतेचा हा परिचय आहे. खादी जीवनांत सर्वांगीण क्रांति करूं शकते, नव्हे तिनें केली पाहिजे, हा तिचा दावा हि यथार्थ असल्याची जीं अनेक उदाहरणें आढळून येतात, त्यांपैकीं हें एक आहे. प्रसंग लहान कीं मोठा हा महत्त्वाचा मुद्दा नसून प्रसंगाच्या मागचें मानसशास्त्र महत्त्वाचें असल्या-मुळें त्याची नोंद घेणें उपयोगाचें वाटल्यामुळें लिहिलें आहे.

---

परमार्थाच्या शाळेंतली 'संसार' ही बिगर यत्ता आहे; 'गृहस्थाश्रम' ही पहिली यत्ता.

www.vinoba.in

# प्रेमाचा धागा काढा !

[ ले० मनोहर दिवाण ]

'तूं जानवें तर घालीत नाहींस मग कांततो कशाला ?' असा माझ्या आत्याबाईंनीं मला एकदां प्रश्न केला होता. 'कोणी जानवें घालो अगर न घालो, कांतो अगर न कांतो, परंतु गुरु नानकाची एक आख्यायिका आहे तेवढी निदान लक्षांत ठेवावी' असें म्हणून त्यांना पुढील प्रसंग वर्णन केला. पुष्कळ वर्षांनंतर परवा त्यांची पुन्हां भेट झाली. तेव्हां त्या म्हणाल्या, 'जानव्याशीं तर कांहीं आमचा संबंध नसतो आणि मी कांतू हि शकलें नाहीं. परंतु तूं सांगितलेली आख्यायिका मात्र विसरलें नाहीं. तिच्या स्मरणानें जीवनांत प्रेमाचा धागा निघूं शकतो असा माझा अनुभव आहे. आज हि अशी च एखादी आख्यायिका सांग.'

इतरांना हि तसाच अनुभव येईल या कल्पनेनें ती पुढें देत आहे.

× × ×

मग नानकाच्या वडिलांनीं त्याच्या उपनयन-समारंभाची जुळवाजुळव केली. सर्व सिद्धता यथासांग झाली. मुहूर्त येऊन ठेपला. जातिबांधव व पंडित जमले. पुरोहित बटूस म्हणूं लागला, 'सावधान हो.' नानकानें त्याच्या डोळ्यांकडे टक लावून पाहिलें व विचारलें, 'गुरुजी, ह्या धाग्याचा उपयोग काय ? त्यापासून काय लाभ होणार ? त्याला धारण करण्याचा अर्थ काय ?'

पुरोहित म्हणाला, 'बाळ ! हें बघ, त्याशिवाय धार्मिक किंवा सामाजिक कोणता च विधि कोणाला करतां येत नाहीं. तो धारण केल्यानें तूं पवित्र होशील. तूं आपल्या वर्णाचा म्हणविण्यास व वर्ण-विहित धर्म आणि आचार पाळण्यास पात्र होशील. ज्याला जानवें नाहीं, त्याला धर्म नाहीं'.

परंतु नानक विचारूं लागला, 'म्हणजे ? एखाद्यानें तें धारण केलें आणि आपला आचार सुधारला नाहीं तरी ? आपले सर्व जातिबांधव कांहीं पवित्र नाहींत, परंतु ते तर सर्व यज्ञोपवीत धारण करतात आणि धर्मविधि करतात. याचा अर्थ ते जानवें घालून हि पवित्र झाले नाहींत असा च ना ?'

यावर काय उत्तर द्यावयाचें तें पुरोहितास सुचेना. तो स्वर चढवून म्हणाला, 'असा वाद घालूं नकोस. शास्त्रांत असें लिहिलेलें आहे. समजलास! आणि आपले सर्व पूर्वज त्याप्रमाणें करीत हि आले आहेत. इतकें तुला पुरें आहे.'

www.vinoba.in


नानक गंभीर झाला. अनंत आणि अव्यक्ताची प्रभा त्याच्या चर्येवर चमकूं लागली, आणि त्याच्या मुखांतून पुढील अविस्मरणीय शब्द बाहेर पडले.—'हे गुरो ! दयेच्या कापसांतून प्रेमाचा धागा काढा. त्याला पावित्र्य, सत्य आणि आत्मसंयम यांच्या ब्रह्मगांठी द्या. या यज्ञोपवीताच्या ध्यानांत मन लीन होऊं द्या. हा धागा कधीं तुटणार नाहीं, कधीं बदलावा लागणार नाहीं व कधीं हरवणार नाहीं. हें असलें यज्ञोपवीत जे धारण करतात ते वंद्य होत. त्यांना अभिवादन करा.'

पुरोहिताचें हि हृदय गहिंवरून आलें. त्या बाल-बटूची ही ज्ञानमय वाणी, सौम्य पण दृढतेनें उच्चारलेली वाणी, पुरोहितांत हि आत्मभाव उत्पन्न करूं लागली. तो म्हणाला, 'निःसंशय तुझे बोल सत्य आहेत, हिताचे आहेत. परंतु तुझ्यासाठीं हा किती खर्च व त्रास घेण्यांत आला आहे ! इकडे तर कांहीं लक्ष देशील ! माझी खात्री आहे, विचार केलास तर तूं हें यज्ञोपवीत स्वीकारशील व धारण करशील.'

'काय ? स्वतःस मी बंधनांत टाकूं ?' नानक विचारूं लागला. 'नाहीं, त्यापेक्षां मला मरण पत्करलें. मी तें धारण करूं शकत नाहीं. खऱ्या श्रद्धेनें आदर होतो. कळकळींच्या आणि सत्यमय वागणुकीनें पूर्णता प्राप्त होते. नाहीं, मी तें धारण करूं शकत नाहीं.'

तेथें जमलेल्यांत एकच गडबड उडाली. पुष्कळ जण काकुळतीनें विनवूं लागले. पुरोहितांनीं धमक्या दिल्या. मित्र स्तुति-खुशामत करूं लागले. परंतु सर्व व्यर्थ. सरतेशेवटीं त्याची आई तेथें आली व म्हणूं लागली, 'बाळ ! बाकीचें राहूं दे. आतां मी म्हणत्ये म्हणून माझ्याकरितां तरी एवढें कर. माझी अशी निराशा करूं नकोस !'

'आई, तुझी आज्ञा पाळणें माझा धर्म आहे. यांचें म्हणणें मात्र पटत नाहीं. हें घे, तुझ्याकरितां मी तें गळ्यांत घालतों' असें म्हणत नानकानें आईच्या पायावर डोकें ठेवलें.

प्रेमांत धर्म आहे, बाह्याचारांत नाहीं हें बालपणापासून च नानकाच्या चित्तावर बिंबलें होतें.

www.vinoba.in

# यंत्राचा उपयोग आणि मानवहित

[ लें. किशोरलाल घ० मशरूवाला ]

(श्री. नरहरभाओी पारेख यांच्या '**यंत्र नी मर्यादा**' या गुजराथी पुस्तकाला जोडलेल्या प्रस्तावनेमधून)

( १ )

शिकलेल्या, सुधारलेल्या आणि समृध्दींत खूप पुढे गेल्यामुळें जवळजवळ सर्वांच्या आदरास पात्र झालेल्या दुनियेला गांधीजींनी आपल्या असामान्य विचारांनीं आणि आंदोलनांनीं अनेक बाबतींत धरणीकंपासारखे प्रचंड धक्के आजपर्यंत दिले आहेत आणि अजून देत आहेत. धक्क्यांचा हा स्वभाव च आहे कीं प्रथम ते सर्वांना—विरोधकांना, सहकाऱ्यांना, मागें रहाणारांना, त्या च प्रमाणें पुढें धांवूं इच्छिणारांना घाबरून सोडतात. अशा रीतीनें गांधीजींची विचारसरणी एका बाजूस प्राचीन रूढिप्रिय सनातनींना जशी बुचकळ्यांत पाडते तशी च ती प्रगतिबाबत चालू जमान्यांतील रूढ विचारांविषयीं प्रेम असणाऱ्यांना हि बुचकळ्यांत पाडते.

गांधीजींनी दिलेल्या धक्क्यांपैकीं बहुतेक धक्क्यांचें प्रथम दर्शन त्यांच्या 'हिंद स्वराज्यांत' होतें. त्यांत पाश्चात्य सभ्यतेवर अत्यंत तीव्र हल्ला आहे. जरी त्यांत ठिकठिकाणीं समतोल राखणारीं वाक्यें असलीं तरी घाईनें वाचलें असतां वाचकावर अशी छाप पडून जाते कीं जणुं काय गांधीजी युरोपांतून आलेल्या एकूण एक विद्या आणि सुधारणांवर वज्र उगारीत आहेत. साहजिक च यामुळें बरेच गैरसमज उत्पन्न झाले आहेत. आणि मागाहून त्यांविषयीं बरेच खुलासे केले असून देखील, ते सहजासहजीं दूर होत नाहींत.

असा च एक गैरसमज त्यांच्या यंत्रविषयक विचारांविषयीं आहे. अध्यापक, विद्वान् आणि त्या च प्रमाणे मुत्सद्दी यांच्या मनांत हि अशी एक समजूत घर करून बसली आहे कीं गांधीजी यंत्रमात्राचे—ती वस्तु यंत्र आहे म्हणून च— विरोधी आहेत. वैज्ञानिक शोधांना ते आपल्या सभ्यतेंत स्थान च देणार नाहींत; त्यांचें जर चालूं शकलें तर ते जगाला इसवी सनाच्या दहाव्या बाराव्या शतका-इतकें मागें घेऊन जातील.

ज्यांचें वाचन गांधीजींच्या 'हिंद स्वराज्या' पुरतें च आहे त्यांच्या मनांत अशी गैर समजूत उत्पन्न झाली तर तें थोडें तरी क्षम्य ठरेल. पण अध्यापक, विद्वान् आणि मुत्सद्दी त्यांच्या नंतरच्या लिखाणांकडे दुर्लक्ष करून 'हिंद स्वराज्या'चा च आधार देत बसतील तर तें मात्र क्षम्य ठरणार नाहीं. म्हणून सर्वांचे सोयीसाठीं आणि

गैरसमजाला मार्ग राहूं नये या करतां या पुस्तकाच्या तिसऱ्या खंडांत यंत्रविषयक गांधीजींच्या सर्व लिखाणांचा संग्रह करण्यांत आला आहे तें फार चांगलें झालें आहे. त्यांत गांधीजींनी स्पष्ट केलें आहे कीं "माझा उद्देश यंत्रमात्राचा विनाश करण्याचा नाहीं पण यंत्रांच्या मर्यादा ठरवण्याचा आहे......आपण जें कांहीं करूं त्यांत प्रधान विचार मानवहिताचा असला पाहिजे. तेवढ्यासाठीं मी यंत्रांचा विवेक करीन. उदाहरणार्थ, 'सिंगर'च्या शिवण-यंत्राचा मी आनंदानें स्वीकार करतों." तें बनवण्यासाठीं भौतिक शक्तीनें चालणाऱ्या मोठ्या कारखान्यांना पण ते स्थान देतील. मात्र, "असे कारखाने राष्ट्राच्या मालकीचे असतील अथवा लोकशाही सरकारमार्फत चालणारे असतील असें मी म्हणेन. असे कारखाने अत्यंत सुंदर आणि आदर्श परिस्थितींत चालत असावेत. त्यांचें अस्तित्व नफ्या-साठीं नव्हे तर लोकहितासाठीं च असावें. लोभाचे जागीं प्रेमाची स्थापना करण्याचा त्यांचा उद्देश रहावा......त्यांचा उपयोग करण्याचे मागील हेतु लोभाचा न राहतां प्रामाणिकपणें दयेचा असला पाहिजे. उदाहरणार्थ, वांकलेल्या त्राकेला सरळ करण्याच्या यंत्राचा मी अत्यंत आनंदानें सत्कार करीन; पण लोहाराचें त्राका * बनवण्याचें काम बंद पडेल असा उद्देश मी ठेवणार नाहीं." पा. (१४०-१४२)

या वाक्यांवरून गांधीजींच्या यंत्रविषयक विचारांचे बाबतींतला गैरसमज दूर व्हावयास पाहिजे.

## ( २ )

तेव्हां इथें केवळ यंत्राचा विरोध नाहीं. यंत्र म्हणून यंत्राचा मोह पण नाहीं. यंत्र हातानें चालवण्याचें असो कीं पायानें चालवण्याचें असो, बैलानें अथवा घोड्यानें चालवण्याचें असो; कीं वाफ, पेट्रोल, वीज इत्यादि भौतिक शक्तींनीं चालवण्याचें असो, साधें असो कीं भानगडीचें असो, कोणत्या हि प्रकारच्या यंत्राचा आंधळा विरोध नाहीं किंवा आंधळा मोह नाहीं. मानव-हिताचा विचार करून, देश-हिताचा विचार करून, वर्तमान परिस्थितीचा विचार करून, प्रत्येक यंत्राचा अलग अलग विचार केला पाहिजे. तसें च कोणत्या प्रकारच्या यंत्राचा कशा रीतीनें आणि किती उपयोग

---

* [टीप:—वाचकांना ऐकून कदाचित् आश्चर्य वाटेल कीं, त्राक सरळ करण्याचें यंत्र बनविण्यासाठीं युरोपांतील यंत्र-निष्णातांना सुद्धां आमंत्रण देण्यांत आलें होतें. पण अजून कोणाला त्याची यांत्रिक युक्ति सुचलेली नाहीं. एका बाजूनें हें काम कठीण आहे; दुसऱ्या बाजूनें हात आणि डोळा तयार करून बारा-तेरा वर्षांचा मुलगा पण तें करूं शकतो.]

www.vinoba.in


आज केला पाहिजे अथवा थांबवला पाहिजे याचा निर्णय केला पाहिजे. हा निर्णय कोणत्या हि बाबतींत कायमचा करून ठेवायचा आहे असें पण समजण्याची जरूर नाहीं. परिस्थिति बदलली तर आज वापरण्यांत असलेलें यंत्र उद्यां बंद करावें लागेल आणि आज मना केलेलें यंत्र उद्यां चालू करावें लागेल. उदाहरणार्थ, खादी-प्रवृत्तीच्या बाबतींत चरखा, पिंजण, रेचा वगैरे मध्यें झालेल्या सुधारणांचा च विचार केला तर आज त्यांमध्यें कांतण्यासाठीं तकलीपासून मगनचरख्यापर्यंत क्रमशः अधिक सूत कांतून देणारीं तीन चार यंत्रें निर्माण झालीं आहेत. आणि या पेक्षां हि जास्त उत्पादन करून देणाऱ्या सुधारणांना अवकाश आहे. पिंजणाच्या बाबतींत पण असें च झालें आहे. हीं सर्व यंत्रें केवळ मनुष्याच्या हातापायांच्या शक्तीनें च चालतात. पण त्यांचा देखील सत्कार किंवा मनाई करतांना स्थानिक परिस्थितीप्रमाणें विवेक करण्याची जरूर राहील. उदाहरणार्थ, दुष्काळामुळें पुष्कळ माणसांना एकदम काम द्यायचें आहे पण इतकें सूत किंवा पेळू तयार करवण्यांत हि लाभ नाहीं आणि तेवढी मजुरी देणें पण परवडणारें नाहीं तर अशा वेळीं साबरमती-पिंजण किंवा मगन-चरखा च काय पण साधी पिंजण आणि साधा चरखा याचा हि उपयोग करतां येणार नाहीं आणि सळीफळी-रेचा, खांडण-विंचरण व तकली यावर च संतोष मानावा लागेल असें संभवतें.

एका रीतीनें असें हि म्हणतां येईल कीं, यंत्राच्या मर्यादांचा आपणांस विचार करायचा आहे असें म्हणण्यापेक्षां वस्तूचें उत्पादन, प्रचार, स्थानांतर आणि देवघेव यांची-थोडक्यांत वाणिज्याची-पद्धति आणि यांचा लोकहितावर होणारा परिणाम तपासून यांच्या मर्यादा च आपणांस ठरवावयाच्या आहेत. भौतिक शक्तींवर चालणाऱ्या प्रचंड यंत्रांनीं वाणिज्याचा फार झपाट्यानें विस्तार केला आहे. आणि लोकहिताच्या दृष्टीनें त्याचे परिणाम कांहीं बरें पण बरेचसे वाईट आले आहेत. त्यासाठीं तशा यंत्रांचा पण विचार करणें प्रस्तुत आहे. या बऱ्या-वाईट परिणामाचे मनोवेधक आणि तपशीलवार चित्र श्री. नरहरिभाई यांनीं पहिल्या खंडाच्या प्रकरणांत सप्रमाण रेखाटलें आहे.

(३)

यंत्र कशाला म्हणावें आणि यंत्र व अवजार यांत फरक काय या विषयीं श्री. नरहरिभाईंनीं दुसऱ्या प्रकरणांत चर्चा केली आहे. ही बाब मी एका निराळ्या रीतीनें समजावण्याचा प्रयत्न करतों.

सुताराची छोटी हतोडी, लोहाराचा मोठा घण आणि लोखंडाच्या मोठ्या कारखान्यांत वापरला जाणारा तीन फूट जाड लोखंडाचा चेंदामेंदा करणारा राक्षस-

घण, हीं तिन्हीं ठोकण्याचीं च साधनें आहेत. तिघांचा हि उपयोग करण्यासाठीं—त्यांना गति देण्यासाठीं—शक्ति लावली पाहिजे. हतोडीला वापरणारा तिला स्वतःची च शक्ति लावतो. घणासाठीं लोहाराला दुसरा साथीदार किंवा मजूर घ्यावा लागतो. कारखान्यांतील राक्षस-घण वापरण्यासाठीं दोन चार किंवा वीस-पंचवीस मजुरांनीं देखील भागायचें नाहीं. शें-दोनशें किंवा पांचशें मजूर एकवटून कोण्या तरी युक्तीनें वापरतील तर च तो वापरतां यावयाचा. हें अतिशय गैर सोईचें व्हावयाचें आणि आयुष्यात एक दोन वेळां च करायचें असेल तर तसें करतां येईल. पण अशा हतोड्याला रोज वापरावयाचें असेल तर ? उघड च आहे कीं हें वाफ, गॅस किंवा वीज यांच्या भौतिक शक्तीनें च होऊं शकेल.

या उदाहरणावरून अवजार आणि यंत्र यांतील भेद ठरवतां येईल. काम करण्याचें साधन तें अवजार होय. तें लहान आहे कीं मोठें आहे ही मुद्याची वस्तु नाहीं. त्या अवजाराला वापरण्यासाठीं योजिलेली शक्ति ज्यापासून घ्यायची तें यंत्र होय. ही शक्ति लहान असो कीं मोठी असो, सजीव असो कीं निर्जीव असो, तीं च खरें यंत्र होय. अशा रीतीनें माणूस यंत्र आहे, बैल किंवा घोडा यंत्र आहे, एंजिन यंत्र आहे, डायनॅमो यंत्र आहे. देशाच्या हिताच्या दृष्टीनें कोणत्या यंत्राची पसंती करायची हा विचार करण्याचा मुद्दा आहे.

साधारण सशक्त माणसाचें बळ घोड्याच्या बळाच्या सहाव्या हिश्शाइतकें मानलें जातें. म्हणजे मनुष्य ⅙ अश्वबळाचें यंत्र आहे. मोटार-गाडीमध्यें चार ते सहा अश्वबळ म्हणजे २४ ते ३६ माणसें वापरलीं जातात. बंगालमध्यें पुष्कळशा शहरांतून एका माणसानें ओढण्याच्या रिक्षा वापरतात. मोटार म्हणजे ४-६ घोड्यांची बगी अथवा २४-३६ मजुरांनीं ओढण्याची रिक्षा च. या च प्रमाणें भौतिक शक्तीनें चालणाऱ्या लहान मोठ्या सर्व साधनांविषयीं म्हणतां येईल.

पण एवढ्यावरून भौतिक शक्तिवाल्या यंत्राचें यंत्रपण पुरें होत नाहीं. मोटारगाडीला ३६ माणसें ओढूं तर शकतील. मोटार अडकून पडते त्यावेळीं आपण पुष्कळ वेळां तसें घडतांना पाहतों हि. पण ३६ माणसें मिळून हि तिला ताशीं ३ मैलाच्या वेगानें तरी ओढूं शकतील कीं नाहीं याची शंका च आहे. घोडा फार झालें तर १५ मैलाच्या गतीनें ओढील. पण भौतिक शक्तिरूपी जें मजूर-दल जुंपण्यांत येतें तें तिला ताशीं ५० मैलाच्या गतीनें ओढूं शकतें. हाच नियम राक्षस-घण आणि भौतिक शक्तीनें चालणाऱ्या इतर साधनांविषयीं.

शिवाय, हा भौतिक मजूर निर्जीव असल्यामुळें एक दुसरा फरक पडतो. मजूर किंवा बैल पुरता खुराक खाऊन हि चोवीस तास काम करूं शकत नाहीं.

www.vinoba.in


फार फार तर दहा अकरा तास काम देईल. पण भौतिक मजुराला केवळ खुराक हवा असतो. विश्रांतीची फारशी जरूर नसते. फार काम असेल तर तुम्ही त्याला रात्रंदिवस चालवूं शकतां. याचा खुराक हि हलका. याला काम नाहीं, क्रोध नाहीं, संसार नाहीं किंवा संसाराचा जंजाळ नाहीं. असा हा राक्षसी शक्तिवाला निर्जीव भौतिक मजूर, सजीव माणूस किंवा पशु-मजूर यांचा जबरदस्त प्रतिस्पर्धी असला तर त्यांत काय नवल ? केवळ कोळसा खाऊन व घासलेट पिऊन एखादा घटोत्कच एखाद्या लक्षाधिपतीच्या इथें नोकरी करायला तयार झाला तर त्याच्या इतर नोकराचाकरांना काम राहणार नाहीं हें समजावून सांगायला नको च.

अशा कारखान्यांत काम करणाऱ्या मजुरांचें स्थान कोणतें याचा आतां विचार करूं. वरील स्पष्टीकरण लक्षांत घेतल्यास कळून येईल कीं कारखान्यांत काम करणारा मजूर—उदा० दोनशें त्राकींवर देखरेख ठेवणारा 'स्पिनर'—खरें पाहिलें तर मजूर नव्हे तर तें यंत्र जितक्या अश्वबळानें चालत असेल तितक्या अश्वांना हांकणारा अथवा त्याच्या सहापट मजुरांचा व त्याच्या बरोबर काम करणाऱ्या दोनशें कांतणारींचा मुकद्दम होय. त्याचा पगार हि मुकद्दम्यासारखा (मुकद्दम्याचा पगार जसा अधिक असतो तसा)च असतो. कारण, कांतणारीला दिवसाकांठीं तीन आण्याप्रमाणें मजुरी मिळते पण याला १२–१४ आणे मजुरी मिळते. पण वरील दोनशें कांतणाऱ्या व त्यांच्या मदतीला असलेलें अश्वबळ यांना खुराक, दुरुस्ती आणि खरेदी-किंमत याशिवाय दुसरी मजुरी चुकवावी लागत नाहीं.

आतां या गोष्टीचा राष्ट्रीय दृष्टचा विचार करायचा राहिला. समजा कीं ६०० सशक्त माणसांचें एक खेडें आहे, ते एक हजार बिघे जमीन नांगरतात, आणि सर्वजण खुराक, वस्त्र, घरदार वगैरे बाबतींत स्वावलंबी जीवन घालवतात. पण आतां तेथें एक ऑईल-पंप येतो, एक पिठाची गिरणी येते, एक तांदुळाची गिरणी निघते आणि एक लहानशी पण भौतिक शक्तीनें चालणारी कापडाची गिरणी हि सुरूं होते. या सगळ्यांमधून दररोज ५०० अश्वबळ शक्ति वापरली जाते. याचा अर्थ असा झाला कीं या गांवांत (५००×६=) ३००० सशक्त माणसांची संख्या वाढली. जर ६०० माणसें या नवीन आलेल्या माणसांचा पुरेपूर उपयोग करून घेऊं शकतील आणि सर्व च मुकद्दम होऊन बसतील तर यांत—निदान आर्थिक दृष्टचा—कांहीं नुकसान नाहीं पण जर याचा परिणाम असा झाला कीं या नव्या ३००० मजुरांवर शंभर माणसें च मुकद्दमी करण्यास पुरेशीं होऊन बाकीचीं ५०० माणसें बेकार झालीं, तर गांवांत एवढी मोठी वस्ती वाढवून काय फायदा मिळवला असा प्रश्न जरूर विचारतां येईल.

www.vinoba.in

यंत्रवादाचा प्रश्न या प्रकारचा आहे. चार कोट इंग्लंडची लोकवस्ती. त्यामध्यें ४० टक्के लोक मजुरी करूं शकणारे असें धरलें तर, जवळ जवळ १६० लाख माणसें झालीं. त्यांत त्यांनीं करोडो अश्वबळ वापरणारे कारखाने दाखल केले आहेत. याचा अर्थ असा झाला कीं त्यांनीं अब्जावधि मजुरांची वस्ती वाढवली. ही वस्ती अशी राक्षसी, निर्जीव आणि थोडी जागा अडविणारी आहे कीं तिच्यावर मुकद्दमी करायला १६० लाखांपैकीं फार च थोडा हिस्सा गुंततो. पण काम मात्र इतकें करूं शकते कीं चीन, हिंदुस्थान आणि ब्रह्मदेशासारख्या देशांसाठीं देखील सगळा माल तयार करूं शकते.

पण इंग्लंडला असें करतां येतें तर दुसऱ्या देशांना कां करतां येऊं नये ? तेव्हां एकूण एक देशांनीं अशा रीतीनें आपल्या लोकवस्तीला अब्जोपट वाढविलें. हे जल-प्रवाह, वात-प्रवाह, बाष्पसेन, विद्युत्सेन यांसारखे करोडो राक्षस उभे ठाकल्यानंतर बिचाऱ्या मनुष्य-यंत्रांचें कितीसें काम राहील ? या राक्षसांची खरेदी-किंमत जरी बरी च असली तरी शेवटीं ते स्वस्त. तेव्हां ज्यांनीं यांना नोकरीवर ठेवण्यास सुरवात केली त्यांना फार मानव-मजुरांची गरज उरली नाहीं आणि ते सारे पृथ्वीवर भार-रूप वाटूं लागले. 'चोराला पकडा' 'चोराला पकडा' अशा बोंबा मारीत कधीं कधीं चोर स्वतः च धांवत सुटतो. त्याप्रमाणें, 'मनुष्यसंख्या वाढत चालली' 'मनुष्य-संख्या वाढत चालली' अशा बोंबा मारण्यास त्यांनीं सुरवात केली आणि राक्षस-संख्या कमी करण्याऐवजीं मनुष्य-संख्या कमी न झाली तर शेवटीं लढाईनें देखील लोकवस्ती घटवण्यास हरकत नाहीं असें हि मानणारे विद्वान् आहेत. पण वर सांगितलेले राक्षस कमी करण्याचा विचार मात्र त्यांना रुचत नाहीं; त्यांत त्यांना भर घालायची आहे.

असे लिहिण्यांत मी विज्ञाना-विषयीं विरोध प्रगट करतो असें नाहीं. वैज्ञानिक बुद्धि, संशोधन आणि विकास थांबवण्यास हि सांगत नाहीं. 'राक्षस' शब्द वापरून यंत्रांचा अपमान करण्याची हि माझी वृत्ति नाहीं. राक्षस म्हणजे हत्तीपेक्षां हि अतिशय जबरदस्त पशु असें समजा. तेव्हां जसा हत्तीचा उपयोग करूं तसा याचा हि उपयोग करतां येईल. म्हणजे असें कीं जें काम केल्याविना सुटका च नाहीं आणि जें इतकें मोठें आहे कीं शेंकडों माणसें किंवा हत्ती जरी आणले तरी त्यांच्याच्यानें होणार नाहीं तिथें त्यांचा उपयोग करणें योग्य ठरेल.

म्हणजे, या राक्षसांची वस्ती किती, कोठें आणि कशा रीतीनें वाढवावी आणि त्यांच्याकडून कोणचें काम घ्यावें, आणि माणसांची वस्ती व अशा यांत्रिक मजुरांची वस्ती यांमध्यें कुणाची पसंती करावी हा च यंत्रवादामध्यें महत्त्वाचा मुद्दा

www.vinoba.in

आहे. याविषयीं थोडक्यांत एवढीच मागणी आहे कीं मनुष्यवस्तीचा बळी देऊन किंवा तिच्या विनाशासाठीं अथवा तिचें बौद्धिक, नैतिक, शारीरिक इ. नुकसान करून या राक्षसांचा उपयोग होता कामा नये. असें होणार नाहीं अशी काळजीपूर्वक खात्री केल्यानंतर त्यांचा योग्य उपयोग करावयास हरकत ना ीं.

( ४ )

काम करण्याचें साधन तें अवजार आणि त्याला गति देणारी शक्ति तें यंत्र, हें वर सांगितलें च. पण ज्या प्रमाणें घोडागाडींतला घोडा आणि गाडी अलग होऊं शकतात त्या प्रमाणें सर्व साधनांमध्यें होऊं शकत नाहीं. कित्येक साधनांमध्यें अवजार आणि गति देणारा एकत्र च असतात. मानवयंत्र अशा प्रकारचें आहे.

आपल्या शरीरांत हात काम करण्याचें साधन आहे तर पाय गति देणारें साधन आहे. पण माणसाचे हात आणि पाय तर लहान लहान आणि नाजुक असतात. हे तसे च राहिले तर फार थोडें काम करूं शकतील आणि फार थोडी गति देऊं शकतील. म्हणून माणसानें आपले हात आणि पाय साधनांच्या द्वारा जास्त लांब करण्याच्या युक्त्या शोधिल्या. तो काठीच्या मदतीनें खूप जड वस्तु उलथवूं शकतो, हतोडीच्या मदतीनें अति कठिण वस्तु तोडूं शकतो, चाकाच्या मदतीनें अतिशय भारी वस्तु ओढूं शकतो. अशा रीतीनें हत्ते असणाऱ्या आणि चाकें असणाऱ्या अनेक प्रकारच्या साधनांनीं मनुष्य काम करूं लागला.

पण सामान्यतः आपल्या देशांत पायाला गति देणारी शक्ति म्हणून वापरून हाताला काम करणारी शक्ति म्हणून वापरण्याचा प्रयोग फारसा झाला नव्हता. बहुतेक अवजारें वापरण्याची रीत अशी होती कीं एका हातानें अवजारापासून काम घ्यायचें आणि दुसऱ्या हातानें अवजाराला गति द्यायची, अथवा एका माणसानें गति द्यायची आणि दुसऱ्या माणसानें काम करायचें.

दुसऱ्या देशांमध्यें पायाचा देखील उपयोग करण्याची रीत पुष्कळ अगोदर प्रचारांत आली. गति देण्यासाठीं पाय आणि काम करण्यासाठीं हात, असा दोघांचा उपयोग त्यांनीं केला. त्यामुळें दोन्हीं हातांनीं काम करण्याची आणि हातापेक्षां पाय गति देण्याकरितां अधिक अनुकूल अवयव असल्यामुळें गति वाढवण्याची सोय झाली. शिवण्याचें हातानें चालवण्याचें यंत्र आणि पायानें चालवण्याचें यंत्र या दोहोंमधील भेद आपणां सर्वांस ठाऊक च आहे. आतां तर शेंकडों साधनांमध्यें गति देण्यासाठीं पायाचा आणि काम करण्यासाठीं हाताचा उपयोग करण्याच्या युक्त्या दाखल करण्यांत आल्या आहेत.

पण ह्या सर्वांमध्यें मूळचें एंजिन–गति देणारी शक्ति–तर माणूस च आहे.

ह्यावरून मी असा नियम सुचवतोः– मनुष्य आपले दोन्ही पाय आणि दोन्ही हात यांच्या मदतीनें जें साधन वापरूं शकेल तें साधन वापरण्यास त्याला कोणी अडवूं

www.vinoba.in



शकत नाहीं. पण हें साधन चालवण्यासाठीं जेव्हां तो एखाद्या बाहेरील शक्तीचा—मग ती शक्ति दुसरा मनुष्य असो, पशु असो अगर एखादें भौतिक तत्त्व असो—उपयोग करील, तेव्हां सामाजिक हिताचा विचार करण्याची जरूर उत्पन्न होते. आणि म्हणून तसें करण्याचा एखाद्याला निरंकुश अधिकार असूं शकत नाहीं. तो दुसऱ्या माणसाची मदत घेईल तर भागीदारीचा प्रश्न उभा राहील, पशूची घेईल तर जीव-दयेचा प्रश्न उभा राहील, भौतिक शक्तीची घेईल तर राष्ट्र-धर्माचा आणि मानवधर्माचा प्रश्न उभा राहील.

साधनें सुधारण्याच्या कित्येक प्रश्नांचें उत्तर यांतून मिळतें. समजा मला विहिरीचें पाणी काढावयाचें आहे. नुसत्या दोरीनें काढतां येईल किंवा गरेडीच्या मदतीनें हि काढतां येईल. गरेडी वापरण्यांत सोय आहे. तेवढें च काम करण्यास थोडे श्रम लागतील आणि यामुळें मी दोन घडे अधिक काढूं शकेन. म्हणून गरेडी वापरण्यास मला कोणी अटकाव करूं शकणार नाहीं. रहाटगाडगें बनवून एकट्यानें पंचवीस घडे ओढण्याची युक्ति योजिली, तरी माझ्या दोन हातांचा आणि दोन पायांचा च उपयोग करीत असल्यामुळें, तसें करण्याचीहि मला मोकळीक रहावी. हात-पंप वापरायला हि मला आडकाठी असूं नये. पण जर मी बैल जुंपून मोट चालवीन किंवा एखादें एंजिन लावीन तर हें करणें जीवदयेला किंवा लोकहिताला अनुकूल आहे असें मला सिद्ध करून द्यावें लागेल.

याच प्रमाणें दोन पातींच्या साध्या कात्रीनें हि न्हावी केंस कापूं शकेल किंवा केंस कापण्याच्या मशीननें हि कापूं शकेल. बुद्धि वापरून एका च वेळीं वीस कात्र्या वापरण्याची युक्ति त्यानें मशीनमध्यें उपयोगांत आणिली आहे. कात्री चालवणारा तर तो एकटा च आहे. म्हणून असें मशीन वापरण्यास त्याला अटकाव करतां येणार नाहीं. पण जर तो विजेनें चालणाऱ्या कात्रीनें केंस कापूं लागेल तर त्याला तसें करूं द्यावयाचें कीं नाहीं ह्याचा निर्णय करण्याचा अधिकार राष्ट्राला आहे.

याप्रमाणें प्रत्येक यांत्रिक सुधारणेविषयीं विचार करतां येईल.

भौतिक शक्तींचा उपयोग केला च पाहिजे अशी कोणती हि जबाबदारी माणसावर नाहीं. पण अस्तित्वांत असणाऱ्या प्रत्येक जीवाचें हित करणें असा मानवधर्म आहे खरा. तेव्हां एका माणसाच्या किंवा एका पशुच्या देखील हिता-करितां भौतिक शक्तींनीं चालणारीं दहा यंत्रें सोडून द्यावीं लागलीं तरी त्यांत अधर्म नाहीं, उलट तसें करणें धर्म च आहे.

जर असें सिद्ध होईल कीं अमुक कामासाठीं मानवशक्ति किंवा पशुशक्ति ही पुरी पडत नाहीं अथवा तें काम करतांना मानव-शक्तीचा किंवा पशुशक्तीचा त्यांत अपव्यय च होईल असें आहे तर त्याठिकाणीं भौतिक शक्तीचा खुशाल उपयोग करावा.

जर हें म्हणणें स्वीकारण्यांत आलें तर यंत्रोद्योग आणि हस्तोद्योग यांमध्यें मेळ साधतां येईल आणि यंत्रवादाला विषय राहणार नाहीं.

www.vinoba.in

# पहांटचें उठणें

[ ले. : वल्लभभाई ]

पहांटेच्या वेळीं सर्व सृष्टि जागृत झालेली असते. रात्रीं वारा वाहत नसला, तरी बहुधा पहांटे वाऱ्याची हालचाल सुरू होते. चारी बाजूला पाहिल्यास असें दिसतें कीं, सर्वांनीं उठून ईश्वराची प्रार्थना करावी, अशी निसर्गाची इच्छा आहे. पक्षी आपल्या भाषेंत ईश्वराची प्रार्थना करीत असतात. वाऱ्यामुळें झाडें हालून जणूं काय तीं ईश्वराला नमन करीत असतात. नदीच्या पाण्यांत वाऱ्यामुळें थोडीशी खळबळ होऊन त्यांत जणूं काय नवीन चैतन्य संचरतें आणि त्यामुळें होणाऱ्या आवाजानें नदी ईश्वराची प्रार्थना करीत असते. अशा प्रकारची निसर्गाची स्थिति असतांना मनुष्य जर शुद्ध मनानें ईश्वराची आराधना करील, तर त्याचें चित्त लवकर च एकाग्र होईल.

सकाळीं चित्त लवकर एकाग्र होण्याचें कारण त्यावेळेस माणसाचा लहानशा प्रमाणांत कां होईना पुनर्जन्म झालेला असतो. त्यामुळें बुद्धि एखाद्या कोऱ्या कागदासारखी असते. त्यावेळीं मनुष्य लहान मुलासारखा च असतो. ज्याप्रमाणें लहानपणीं संस्कार लवकर उमटतात, त्याप्रमाणें पहांटे संस्कार लवकर उमटतात. सकाळच्या वेळची पवित्रता लक्षांत घेऊन, नेहमीं खोटें बोलण्याचा धंदा करणारे लोक सुद्धां रामपहरांत खोटें बोलूं नये, असें म्हणत असतात.

सकाळीं लवकर उठणाऱ्याची कल्पनाशक्ति तीव्र असते. रात्रीं विश्रांति मिळाल्यामुळें बुद्धि ताजी असते. तसें च बीजाचा ज्याप्रमाणें जमिनींत गुप्तरूपानें विकास होऊन त्याला कोंब फुटतो, त्याप्रमाणें रात्रीं गाढ झोंपेंत विचारांचा विकास होऊन सकाळीं नवीन कल्पनेचा कोंब फुटतो. मोठ-मोठे कवि किंवा ग्रंथकार त्याच वेळेस आपापलीं काव्यें किंवा ग्रंथ लिहितात. उषःकालचा वेळ अध्ययनाला उत्कृष्ट आहे. दिलीप राजा वसिष्ठाच्या आश्रमांत निजला होता, तो सकाळीं आश्रमवासी लोकांच्या अध्ययनाचा आवाज ऐकून जागा

www.vinoba.in


झाला, असें रघु-वंशांत कालिदासानें वर्णिलें आहे. मनूनें हि पहांटें उठून आत्मचिंतनाचा अभ्यास करावा असें म्हटलें आहे.

कर्म-योगाला हि हा वेळ उत्तम असतो. शेतकरी लोक पहांटें उठून कामाला जातात.

उपनिषदांत काल-पुरुषाला अश्वाची उपमा दिली असून, उषा हें त्याचें शिर आहे, अशी कल्पना केली आहे. ह्यावरून जो माणूस उषःकाल फुकट घालवितो, तो काल-पुरुषाचा शिरच्छेद करतो, असा अर्थ होतो. दिवसाची बाल्यावस्था फुकट घालवितो तो आपल्या सबंध आयुष्याचें मातेरें करून घेतो. ऋषि पहांटें उठणारे होते. म्हणून त्यांनीं आपल्या देवांना हि 'उषर्बुधः' म्हणजे उषःकालीं जागणारे असें संबोधिलें आहे.

---

## खादी व्यापक कशी होईल ?

[ ले० बुद्धसेन दरबार ]

कांहीं महिन्यांपूर्वीं चरखासंघ आणि गांधी-सेवा-संघ ह्यांची संयुक्त बैठक भरली होती. त्यांत 'खादी व्यापक कशी होईल ?' असा प्रश्न सर्वांच्या समोर प्रामुख्यानें होता.

खादीची प्रगति व्हावी तशी होत नाहीं आणि खादीशिवाय तरणोपाय नाहीं ह्या दोन्ही मुद्यांविषयीं कोणाचें च दुमत नव्हतें. मात्र ती व्यापक कशी होईल ह्याचें सर्वांना च कोडें पडलें होतें.

चर्चेंत (१) मिलवर कर बसवून खादीला मदत (बाउन्टी) द्यावी, (२) श्रीमंत लोकांकडून देणग्या घेऊन खादी स्वस्त भावांत विकावी, ३ कमींत-कमी मजुरी देऊन शक्य तेवढी स्वस्त खादी काढावी इत्यादि अशा च प्रकारचे मुद्दे मंडळींनीं सुचविले. आणि माझ्या डोक्यांत सुद्धां खादी

www.vinoba.in


मिलच्या भावांत पडेल इतकी स्वस्त काढावी अशी योजना होती. ती योजना एके दिवशीं मी पूज्य विनोबांच्या समोर मांडली. तेव्हां ते म्हणाले, 'आम्हांला खादीचा नुसता प्रसार करावयाचा नाहीं तर प्रचार करावयाचा आहे.' मला वाटतें ही दृष्टि खादीच्या कार्याची खरी दिशा ठरविणारी आहे.

'येन केन प्रकारेण' प्रसृत झालेली खादी स्वराज्य मिळवून देणारी होणार नाहीं. समजा उद्यां सरकारनें आपल्या सर्वांच्या आग्रहास्तव संपूर्ण राष्ट्रांत खादीचा कपडा कायद्यानें दाखल केला तर त्यानें आपलें कार्य संपेल काय ? सरकारनें तसें केलें तर त्याचा परिणाम इतका च होईल कीं, लोक खादीचा कपडा वापरून इतर वस्तु परदेशी विकत घेतील. पोलीस खादीचा पोषाख करून लोकांवर जुलुम जबरदस्ती करतील. आम जनता खादी वापरून आजच्या इतकी च भित्री राहील. म्हणजे आज जें कांहीं चाललें आहे तें उद्यां खादीचा कपडा वापरून चालेल इतकें च. कारण स्वराज्याला लागणारे इतर गुण आमच्यांत आलेले नसतील.

स्वराज्य हें नुसत्या खादी ह्या कापडाच्या प्रसारानें मिळणार नाहीं तर तें खादीच्या सहचारी भावानें युक्त अशा खादीच्या प्रचारानें च प्राप्त होईल. तसें न झालें आणि खादी ह्या कापडाचा नुसता प्रसार झाला तर राष्ट्रीय भावना, निर्भयता, हिंदु-मुस्लिम ऐक्य, अस्पृश्यता निवारण, ग्रामोद्योग इत्यादि स्वराज्याला आवश्यक असलेले गुण दाखल करण्याला ती च अडचण पडेल जी आज खादीच्या प्रचाराला पडून राहिली आहे.

एका मुलाला मास्तरांनीं परिक्षेच्या वेळीं 'दहा पेरू आणि पंधरा पेरू मिळून किती पेरू होतात ?' असा प्रश्न केला. मुलगा गोंधळला आणि म्हणाला, 'सर ! पेरूचें गणित तर तुम्ही आम्हांला शिकविलें च नाहीं. दहा केळीं आणि पंधरा केळीं मिळून किती होतात येवढें च काय तें आम्ही पाठ केलें आहे.'

बेरजेचें तत्त्व न शिकविल्यामुळें त्या मुलाची जी दशा झाली ती च दशा खादी ह्या कापडाच्या नुसत्या प्रसारानें आमच्या समाजाची होईल.

www.vinoba.in



तसल्या प्रसारानें बऱ्या च लोकांना उद्योग जरूर मिळेल आणि तो हि लाभ कांहीं लहान सहान नसला तरी स्वराज्य मिळवून देण्याचा बाणा बाळगणारी खादी ती ठरणार नाहीं.

स्वराज्याचा बाणा बाळगणाऱ्या खादीचा प्रसार हळूहळू होईल. पण एखाद्यानें एकदां त्या तात्त्विक खादीचा स्वीकार केला कीं मग त्याला ग्रामोद्योगाच्या वस्तु वापर म्हणून पुन्हां समजून सांगावें लागणार नाहीं. त्याच्या ठिकाणी खरी ग्रामीण-वृत्ति आपोआप च दाखल होईल. मात्र तसल्या खादीचा प्रसार 'चटकन' होणार नाहीं. खादीचें कार्य सुरू होऊन वीस वर्षें झालीं आणि इतक्या अवधींत संपूर्ण हिंदुस्थानांत अवघे एखादा लाख खादीधारी झाले असतील. आणि अशा च प्रकारें चाललें तर चाळीस कोट लोक खादीधारी होण्याला गणितानें ८० हजार वर्षें लागतील, आणि खादीशिवाय स्वराज्य मिळणार नसेल तर मग स्वराज्याची आशा बाळगणें च वृथा आहे असें कोणी म्हणेल. पण हें गणित अशा प्रकारच नाहीं. येथें आकर्षणाचा न्याय लागू आहे. एखाद्या वस्तूला भूपृष्ठावरून पांच मैल उंच कोणत्या तरी शक्तीच्या योगानें फेंकलें कीं मग पुढचें पांच हजार मैल गांठण्याला तुम्हाला हजार पट शक्ति खर्चावी लागत नाहीं तर पांच मैल उंच फेंकण्यास लागणाऱ्या शक्तीनें च पुढील सर्व कार्य होईल. मात्र पांच मैल ऊंच फेंकण्याला बलवान शक्ति लागेल.

त्या च प्रमाणें संपूर्ण हिंदुस्थान खादीमय बनविण्यासाठीं पांच-दहा लाख लोक खादीधारी म्हणजे खादीचें संपूर्ण तत्त्व समजून त्या प्रमाणें आचरण करणारीं त्यागी माणसें बनविण्याला जी कांहीं शक्ति आणि जो कांहीं काळ लागेल तो लागेल. पण त्यापुढें चाळीस कोटी लोकांना खादीधारी होण्याला किंवा स्वराज्य मिळण्याला अधिक शक्ति किंवा अधिक काळ लागणार नाहीं. मात्र पांच-दहा लाख माणसें कमदार लागतील.

www.vinoba.in

# वाचकांना

[ विनोबा ]

मला तुमच्याशीं पुष्कळ बोलावयाचें आहे. तुमच्यांतले जे अगदीं न शिकलेले लोक असतील त्यांच्याशीं हि मला बोलावयाचें आहे. त्यांच्याशीं च मला ज्यास्त बोलावयाचें आहे. माझें बोलणें सगळयांनीं च ऐकावें अशी माझी इच्छा आहे. पण त्यांतल्या त्यांत ज्यांना लिहितां वाचता येत नाहीं, अशा गरीब लोकांनीं ऐकावें अशी माझी खास इच्छा आहे. पण हें कसें घडून येणार ? माझें बोलणें त्यांच्या कानीं कसे जाणार ? पण ही काळजी आपल्याला नको. जी गोष्ट ज्याला ऐकण्याची जरूर आहे ती गोष्ट त्याच्या कानावर घालण्याची सोय देवाजीला करणें च आहे. तो सारें पाहून घेईल. दीन-गरीब अज्ञान-दुबळे लोक तर देवाचे लाडके आहेत. तेव्हां सगळा भार त्याच्यावर टाकून आपण आपलें काम करावें म्हणजे झालें.

मी तुमच्याशीं मराठें बोलणें बोलणार आहे. तुम्ही म्हणाल 'हें काय मोठें सांगितलेंस ? मराठे लोकांशींच बोलतोस, तर काय कानडें बोलणें बोलशील ?' पण माझें म्हणणें तसें नाहीं. 'मराठें' बोलणें म्हणजे 'मराठी भाषेंतलें' बोलणें असाच केवळ अर्थ नाहीं. मराठें बोलणें हें खास वेगळें च बोलणें आहे. ज्ञानोबारायांनीं तें समजावून सांगितलें आहे. देवांनीं अर्जुनाला ज्ञानाचा उपदेश केला. तो अर्जुनाला कांहीं नीट उमजला नाहीं. त्याचा उलट जास्ती च घोंटाळा झाला. तेव्हां तो देवाला म्हणतो, 'देवा, मला कीं नाहीं, हें तुमचें भावार्थाचें दुरून दुरून सांगितलेलें कांहीं समजत नाहीं. मला आपलें साधें मराठें बोलणें सांगाल तर कांहीं तरी समजेल. मी आहे अतिशय जड बुद्धीचा.' तेव्हां ज्ञानोबाराय म्हणतात कीं, पुढें देवांनीं त्याला मराठें बोलणें सांगितलें. अर्जून कांहीं जड बुद्धीचा नव्हता. तुमच्याआमच्या-सारख्या अज्ञान जीवांची सोय व्हावी म्हणून अर्जुनानें आपल्याकडे कमीपणा घेऊन देवाकडून मराठें बोलणें वदविलें. असो, तो कांहीं आपला सवाल नाहीं. मराठें बोलणें म्हणजे काय हा आपला सवाल आहे. मराठें बोलणें म्हणजे

साधें, सरळ उघड उघड बोलणें. मनांत जसें असेल तसें, अगदीं खुल्लें एक घाव कीं दोन तुकडे असें बोलणें ह्याचें नांव मराठें बोलणें. थोडक्यांत मराठें बोलणें म्हणजे 'खरें बोलणें' असा ह्याचा अर्थ झाला. असलें मराठें बोलणें तुमच्याशीं बोलावें अशी माझी इच्छा आहे.

मी मघांशीं सांगितलें च कीं, देव दीन-दुबळ्यांचा आहे. ही गोष्ट पुराणांतरीं लिहिलेली आहे. देव अनाथांचा नाथ आहे. दीनांचा दयाळ आहे. पतितांचा संभाळ करणारा आहे. गरीबांचा बेली आहे. संकटांत सांपडलेल्यांचा कैवारी, टाकोंटाकीं धावून येणारा, पाठीराखा आहे. अशीं ठिकठिकाणीं वचनें आहेत. तुका वाणी, नामा शिंपी, जनी दासी, सांवता माळी, गोरा कुंभार, रोहिदास चांभार, चोखामेळा महार, सजन कसाई ` सगळे देवाचे भक्त. जे जितके अधिक दीन ते तितके अधिक प्यारे ! तसें च म्हटलें तर देवाला कोण प्यारे नाहींत ? देवाला सगळे च प्यारे आहेत. श्रीमंत गरीब, शिकलेले न शिकलेले, बलवान अशक्त सगळे देवाला प्यारे च आहेत. तरी पण पुनः "त्यांतल्या त्यांत" आहे च. देव सगळ्या च दुनियेचा नाथ आहे—विश्व-नाथ आहे. पण विश्व-नाथ हें नांव देवाचें तितकेंसें आवडतें नाहीं, जितकें 'दीन-नाथ' हें नांव आवडतें आहे. ही अगदीं पहिली गोष्ट च मला सांगावयाची होती. ह्याच्या पुढें दुसऱ्या गोष्टी.

[महाराष्ट्र-धर्म १९२४]

---

'विश्वनाथ' हा देवाचा धंदा
'दीनानाथ' हा धर्म

—विनोबा

# ❀ वर्धा तालुक्यांतील १९४० सालच्या वस्त्र-स्वावलंबी लोकांचीं नांवें

**सुरगांव :—**

१ आत्माराम पाटील
२ पू. नानाजी महाराज
३ भाऊराव वानखेडे
४ वल्लभभाई पटेल
५ बाजीराव पाटील
६ नारायणराव
७ महादेवराव
८ पंजाबराव वानखेडे
९ निळकंठराव भोयर
१० शामरावजी
११ पंढरीनाथ
१२ गोविंदराव वानखेडे
१३ वामनराव
१४ महादेव वानखेडे
१५ पंजाबराव भोयर
१६ भाऊराव बापूराव
१७ भिवाबाई
१८ माणिकदादा पाटील
१९ अक्काबाई
२० तानबा सिताराम
२१ ताराबाई
२२ बाबा पाटील
२३ शंकर अजाबराव
२४ भाऊराव सोनार
२५ विनायकराव
२६ गुजाबराव पाटील
२७ उमराव बी०
२८ तुकाराम पाटील
२९ रुपचंद

**पौनार :—**

१ शंकर सातपुते
२ गणपतराव वोकडे
३ नामदेवराव
४ कोटीजी
५ केशवराव तेलरांधे
६ पूज्य विनोबाजी भावे
७ मारोतराव वाघमारे
८ तुकारामजी बांगडे
९ लक्ष्मण हिवरे

**सोनेगांव :—**

१ नाना आंदुरकर
२ भास्करराव
३ महादेव नरेकर
४ ज्ञानोबा
५ भाऊराव भोयर
६ रामभाऊ इंगोले

**देवळी :—**

१ पांडुरंग नामाजी कोंडे
२ घुलाराम शेंडे
३ बावाजी भागवत
४ बापूराव आंदुरकर
५ पांडुरंगजी शेंडे

**रोहिणी :—**

१ अंबादास रुखब्सा
२ नामदेवराव मानकर
३ वामनराव वसू
४ पार्वतीबाई मानकर
५ जगन्नाथराव वसू

www.vinoba.in



**भानखेड :—**

१ दादा मास्तर

२ भाऊराव बाभुळकर

३ विठोबा मालकर

**पौनूर :—**

१ रामचंद्रराव चौधरी

२ कृष्णराव

३ हरिभाऊ

**आंजी :—**

१ बाबाजी मोघे

२ नारायणराव बोडखे

३ मारोती निंबूळकर

**दिघी :—**

१ जानराव तिगांवकर

२ महादेवराव कदम

**सेलसुरा :—**

१ तुकाराम मास्तर

२ विठोबा भारती

३ रामचंद्र पाटील

**वायफड :—**

१ नथ्थोबा घोडमारे

२ आत्माराम दिवाजी

**नागझरी :—**

१ गंगाराम हरिजन

२ काशिनाथ मास्तर

**गिरोली :—**

१ नथ्थू

**मदनी :—**

१ रामभाऊ शेंडे

**बाभुळगांव :—**

१ वामनराव

**बोरगांव :—**

१ सत्यभामाबाई

२ जागोबा गायकवाड

**सिंदी मोठी :—**

१ विश्वनाथ सदाशिव कोमटी

**चिखली :—**

१ पंजाबराव

**सेलू :—**

१ मारोती अरगडे

**वडध :—**

१ विश्वासराव बडतकार

**अलमडोह :—**

१ माधवराव राणे

---

* ही यादी वर्धाशहर आणि संस्था सोडून आहे. आणि वस्त्रस्वावलंबी ह्याचा अर्थ इतका च कीं संपूर्ण वर्षांत स्वतः कांतून नालवाडी विणकाम कार्यालयांत ज्यांनीं विणवून घेतले असा आहे.

**सूचना—**

नालवाडीच्या विणकाम कार्यालयांत तालुक्याबाहरचें आणि संस्थांचें खाजगी विणाईचें सूत घेण्याचें कांहीं दिवसांपुरतें बंद केलें होतें. परंतु आतां विणाईची व्यवस्था पूर्ववत् झाली असल्यामुळ सूत कार्यालयांत स्वीकारण्याची पूर्वीप्रमाणें सुरुवात करण्यांत आली आहे.

नालवाडी,
११-४-४१

मंत्री,
खादी समिति

---

प्रकाशक:–गोपाळ नरहर काळे, ग्राम-सेवा-मंडल, नालवाडी, वर्धा
मुद्रक:–वल्लभदास जाजू, श्रीकृष्ण प्रिंटिंग वर्क्स लिमिटेड, वर्धा